# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विश्रामबाग, मिरज-४१६ ४१०.
दूरध्वनी क्रमांक – कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
Email : gpmiraj@gmail.com Website : www.gpmiraj.ac.in


दिनांक:- ०१/०३/२०२१.

जा.क्र.शातंमि/विवि/नियमितवर्ग/२०२१/ 502

परिपत्रक:-

**विषय - संस्थेमधील नियमित वर्ग व वसतिगृहे सुरु करणेबाबत...**

संदर्भ - १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.६/विशि-३, दिनांक ०३/०२/२०२१.

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सांगली यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक गृह.१/कार्या-६/नै.आ./आरआर-४५१/ ४५७/२०२१, दिनांक - २२/०२/२०२१.

उपरोक्त विषयांस अनुसरुन संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी यांना कळविणेत येते की, उपरोक्त संदर्भ क्र. ०१ व संदर्भ क्र. ०२ अन्वये सुचित केले नुसार संस्थेतील नियमित वर्ग अटी व शर्तीचे पालन करुन सुरु करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सोबत संदर्भासाठी दोन्हीही संदर्भ सोबत जोडले आहेत. त्यानुसार संस्थेतील नियमित वर्ग तात्काळ प्रभावाने खालीलप्रमाणेचे पालन करुन सुरु करण्यात येत आहेत.

१) उपरोक्त संदर्भीय आदेशामध्ये दिलेल्या नियमांचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांची राहिल.

२) सदर नियमावलीची अंमलबजावणीवर देखरेख व नियंत्रण बाबत दक्षता घेणेकरीता खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभाग |
|---|---|
| ०१ | विभागप्रमुख स्थापत्य अभि. |
| ०२ | विभागप्रमुख यंत्र अभि. |
| ०३ | विभागप्रमुख संगणक अभि. |
| ०४ | विभागप्रमुख मेडिकल इले. |
| ०५ | विभागप्रमुख प्लास्टीक अभि. |
| ०६ | कर्मशाळा अधिक्षक |
| ०७ | प्र. नियंत्रक, विज्ञान व मानव्यशास्त्र विभाग |
| ०८ | प्र. अधिकारी, उपयोजित यंत्रशास्त्र |
| ०९ | प्रबंधक |
| १० | एव्हीएड टेक्निशिअन |

३) उपरोक्त नियुक्त करण्यात आलेल्या समितीने संदर्भीय शासन परिपत्रक व मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचे संदर्भीय पत्रामध्ये नमुद केले प्रमाणेच्या बाबींची दक्षता घ्यावी.

४) नियमित वर्ग सुरु करणेबाबत उपरोक्त संदर्भान्वयेच्या सुचना विचारात घेवून प्रत्येक विभागाने आपआपल्या विभागाचे सविस्तर वेळापत्रक करुन ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे व त्याची अंमलबजावणी करावी.

५) वसतिगृह सुरु करणेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित केले जातील.

(कॅप्टन डॉ. नितीन पां. सोनजे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

पुढील पानावर...

Office order/
279